



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA







vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रवीवार २४मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# उमेदवारी जाहिर होण्यापूर्वीच बीड जिल्ह्यामध्ये शेतकरीपुत्र बजरंग सोनवणे यांच्याच नावाची चर्चा

## अनेक वर्षानंतर बीड जिल्हयाला मिळणार सर्वसामान्य विकसनशील नेतृत्व...



**वादळवार्ता/बीड**
देशात लोकसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं असून केंद्रीय निवडणूक आयोगाने सात टप्प्यातील निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला. त्यानुसार १९ एप्रिलपासून देशात लोकसभा निवडणूक होणार असून ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. तर, महाराष्ट्रातही ५ टप्प्यांत निवडणूक होणार आहे. यंदा १८ व्या लोकसभेसाठी निवडणूक होत आहे. त्यानुसार प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली .आदर्श आचार संहिता लागु झाली. त्यातच भाजपाने बीड जिल्हयाचा उमेदवार म्हणुन माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांचे नाव जाहिर झाले. मात्र आद्यापर्यंत महाविकास आघाडीचा उमेदवार जाहिर झालेले नाही. असे असताना मात्र संभाव्य उमेदवार म्हणुन शेतकरीपुत्र बजरंग सोनवणे यांच्याच नावाच्या चर्चेला बीड जिल्हयात उधाण आले आहे. या बाबत माहिती अशी कि एकीकडे माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या ताईसाहेब तथा माजी ग्राम विकास मंत्री पंकजा मुंडे याचे नेतृत्त्व तर दुसरीकडे सर्वसामान्यातुन विकसित झालेले शेतकरीपुत्र बजरंग सोनवणे यांचे नेतृत्व .

बजरंग सोनवणे यांनी ग्रांमपंचायत, सोसायटया, नगरपंचायत, जिल्हा परिषद आदि विविध ग्रामीण स्तरावरील निवडणुकीच्या माध्यमातुन आपला राजकीय ठसा जिल्हाभरात उमटवला त्यातुनच सर्वसामान्य माणसांच्या सुःख-दु:खामध्ये जाणे , मदत करणे कार्यकर्त्यांशी एकरूप रहाने यातुनच नेतृत्वाचा विकास झाला. त्यामुळेच ते अवघ्या जिल्हयाभरात शेतकरीपुत्र म्हणून प्रसिद्ध आहेत. ऐवढयावरच न थांबता त्यांनी शेतऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी येडेश्वरी साखर कारखान्याची निर्मिती करून सामाजिकतेचा वसा जोपासला. म्हणूनच कि काय आज महाविकास आघाडीचा उमेदवार जाहिर होण्याअगोदरच गाव ,वस्ती, ताड्यांवर नव्हे तर संपूर्ण बीड जिल्हयात बजरंग सोनवणे यांच्या नावाच्या चर्चेला उधाण आले आहे. त्यातच बीड जिल्हयाचा खरा शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक विकास होणार असे सर्वसामान्य नागरिकांत बोलले जात आहे .

## गरजवंत मराठे आणि वंचितांच्या प्रश्नांसाठी अशोक हिंगे पाटील यांनी लोकसभा लढवावी-बाबुराव मस्के



**वादळवार्ता/बीड** आगामी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत गरजवंत मराठा समाजाच्या व वंचित उपेक्षित वर्गाच्या प्रश्न संसदेत मांडण्या साठी अशोक भाऊ हिंगे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवडणूक लढवावी अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे पुर्व जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के यांनी केली आहे.

अशोक भाऊ हिंगे पाटील हे गेल्या तीस वर्षांपासून मराठा आरक्षण लढ्यात सक्रिय असुन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ते अनेक वेळा रस्त्यावर उतरले आहेत.समाजातील अनिष्ट रुढी प्रथा परंपरा दुर करण्यासाठी सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून समाज प्रबोधनाचे काम केले आहे.

गेल्या पाच वर्षांपासून ते श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मराठवाड्यात त्यांनी वंचित च काम उभा करून वंचित उपेक्षित मुस्लीम ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी वंचित च्या माध्यमातून ते रस्त्यावर उतरले आहेत. बीडच्या रेल्वे प्रश्न, मराठवाड्याला २१ टीमसी पाण्याचा प्रश्न, दुष्काळी मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्रातुन पाणी सोडण्याचा प्रश्न, यावरील आंदोलनात अशोक भाऊंचा सक्रिय सहभाग राहीलेला आहे.यंदा मराठवाड्यात संपूर्ण दुष्काळ जाहीर करा या मागणीसाठी सर्व प्रथम वीस पंचवीस हजारांचा मोर्चा आयुक्त कार्यालयावर काढला होता. जिल्ह्यातील मराठा आरक्षण मुस्लिम आरक्षण , ओबीसी चे राजकीय आरक्षण मुस्लीम समाजाचे शाहीन बाग आंदोलन, यासारखे सामाजिक, राजकीय विकास प्रश्नावरील आंदोलन अशोक भाऊंच्या सक्रिय सहभागा शिवाय पार पडत नाहीत हे जिल्ह्याने बघीतलेले आहे. शिव शाहु फुले आंबेडकर विचारसणीवर आयुष्यभर चालणारा हा सर्व सामान्य मराठा समाजाचा युवा नेता प्रस्थापित नेत्यांनी कायम वंचित ठेवलेला आहे. म्हणुन श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी बीड लोकसभेसाठी अशोक हिंगे यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी आम्ही कार्यकर्ते करणार असुन उमेदवारी मिळाल्यास हिंगे यांच्या पाठीशी गरजवंत आणि उपेक्षित मराठा समाज दलित अल्प संख्याक ओबीसी समाज त्यांच्या पाठीशी राहील असा विश्वास आंबेडकर साहेबांना आम्ही देणार आहोत अशी माहिती बाबुराव मस्के यांनी दिली आहे.

## जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत परळीत विविध विषयांवर बैठक


**वादळवार्ता/परळी वैज्यनाथ**
जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या उपस्थीतीत पाणी, चारा टंचाई , मनरेगा



तसेच ३९ बीड लोकसभा निवडणूकच्या अनुषंगाने २३३-परळी विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक परळी तहसील कार्यालयात आज झाली. या बैठकीस तालुक्यातील सर्व विभागांचे कार्यालयीन प्रमुख उपस्थित होते. यावेळी परळी तालुक्यातील पाणी, चारा टंचाई तसेच निवडणूक ही संदर्भात केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला आणि नागरिकांना पाण्याची कमतरता होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. जिल्ह्यात चारा वाहतूक बंदी असून पशुधनाला चाराने कमी पडणार नाही याची काळजी घ्यावी असे सांगितले. निवडणुकीच्या काळात महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण केली जाऊ शकतात त्यामुळे या अंतर्गत असणारी कामे सुरू ठेवण्याबाबत निर्देशित केले. बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघ संवेदनशील असून या मतदारसंघात आचारसंहितेचे सर्व नियमांचे पालन व्हावे तसेच कुणीही आदर्श आचारसंहितेच भंग होणार नाही याची काळजी घ्यावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. विविध निवडणूक कक्षाला यावेळी जिल्हाधिकारी यांनी भेट दिली.

# बीड जिल्ह्याबाहेर चारा वाहतुक करण्यास बंदी जिल्हाधिकाऱ्यांनी काढला आदेश !

**वादळवार्ता/परवेज पटेल**
जिल्हयात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने पशुधनासाठी चा-याची टंचाई होण्याची गंभीर शक्यता असल्याने जिल्हयाबाहेर चारा वाहतूक करण्यास मनाई आदेश जिल्हादंडाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी आज झालेल्या बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीनंतर आदेश जारी करण्यात आले. जिल्हयात सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान झाले असून भविष्यात पशुधनासाठी चा-याची टंचाईची परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. जिल्हयात मागील वर्षाच्या पेरणी अहवालानुसार दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी १८६४५८.७७ मे. टन चारा शिल्लक असून तो अंदाजे ४३ दिवस पुरेल चा-याची उपलब्धता पाहता भविष्यात टंचाई भासु शकते. जिल्हयात उपलब्ध होणारा सर्व प्रकारचा चारा याची इतर जिल्हयात वाहतुक करण्यास बंदी आणने जिल्हयाबाहेरील निविदा धारकांना लिलाव देण्यात येऊ नये. करुन बीड जिल्हयात चारा टंचाई भासणार नाही. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी जिल्हादंडधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार बीड जिल्हयात उत्पादित होणारा किंवा सद्यस्थितीत असणारा सर्व प्रकारचा वाळलेला व ओला चारा बीड जिल्हयाबाहेर वाहतुक करण्यास पुढील आदेश येईपर्यंत मनाई करण्यात आली आहे.



## लोकसभा निवडणूक

### राज ठाकरे शिवसेनेचे प्रमुख? भाजपची सर्वात मोठी ऑफर?



आधी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांसोबत दिल्लीत बैठक... नंतर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत मुंबईत ताज लँड्स हॉटेलमध्ये चर्चा.... राज ठाकरेंसोबत भाजपचं केंद्रीय नेतृत्व आणि महाराष्ट्रातल्या नेतृत्वासोबत ही चर्चा फक्त मनसेला महायुतीत घेणं एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. राज ठाकरेंना सोबत घेण्यामागं, मोठी रणनीती असल्याची चर्चा आहे. सध्याच्या राजकीय स्थितीनुसार भाजपनं राज ठाकरेंसमोर 3 पर्याय ठेवल्याचं कळतंय.

### उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती राहिली नाही, प्रकाश आंबेडकर



प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची अखेर फारकत झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबत आता युती राहिली नाही, अशी मोठी घोषणा प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. आता महाविकास आघाडीसोबत जमले तरच युती. नाही तर युती नाही, अशी घोषणाही प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत एकच खळबळ उडाली आहे.

### उदयनराजे दिल्लीत, वाद महाराष्ट्रात



मविआकडून कोल्हापुरातल्या शाहू छत्रपतींचं नाव खूप दिवस आधीच पक्कं झालं. मात्र दुसरीकडे महायुतीकडून सातारच्या उदनयराजेंच्या उमेदवारीबाबत अद्यापही सस्पेन्स आहे. एकीकडे कोल्हापूरच्या राजेंना ३ पक्ष घरी येवून उमेदवारीचा आग्रह धरतायत आणि दुसरीकडे सातारच्या उदयनराजेंना तिकीटासाठी ३ दिवस दिल्लीत मुक्काम करावा लागतोय, असं म्हणत ठाकरेंच्या युवासेनेनं भाजपवर टीका केलीय. आरोपांनुसार गेली ३ दिवस उदयनराजे तिकीटासाठी दिल्लीत आहेत. पण अमित शाहांची त्यांची भेट होऊ शकलेली नाही. विशेष म्हणजे विरोधकच नव्हे तर खुद्द भाजपचे नरेंद्र पाटील सुद्धा याबद्दल खंत व्यक्त करतायत. तर विरोधकही भाजपवर निशाणा साधत आहेत. उदयनराजे भाजप मध्ये प्रवेश करताना मोठा कार्यक्रम घेतला मात्र आज दिल्लीत वरिष्ठ नेत्यांची भेट घेण्यासाठी त्यांना तीन दिवस ताटकळत बसावं लागतंय, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

# मनसेच्या आक्रमक पवित्र्यामुळे जिल्हा प्रशासनाने सुरेश कुटेंचा पासपोर्ट जप्त

**वादळवार्ता/बीड**
ज्ञानराधा मल्टीस्टेट व साईराम अर्बन मल्टीस्टेटच्या ठेवीदारांसाठी आंदोलन उभे करत संबंधित चेअरमन यांचे पासपोर्ट जप्त करण्याची मागणी २९ नोव्हेंबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांना महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे , जिल्हाध्यक्ष सुमंत धस , जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोठे व तत्कालीन जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे यांनी केली होती. वेळोवेळी प्रशासनाला पासपोर्ट जप्त करण्यासंदर्भात मागणी लावून धरल्याने शेवटी जिल्हा प्रशासनाने ज्ञानराधा मल्टीस्टेट कॉपरेटचे चेअरमन सुरेश कुटे व्हॉइस चेअरमन कुलकर्णी यांचे पासपोर्ट जप्त केले आहे. साईराम मल्टीस्टेटचे शाहीनाथ परभणे यांचाही पासपोर्ट जप्त करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली असून शाहीनाथ परभने यांचाही पासपोर्ट जप्त करत तिरुमला ऑइल इंडस्ट्रीजच्या एम.डी अर्चना कुटे यांचाही पासपोर्ट जप्त करण्याची मागणी करण्यात येत आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव संस्थेत बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील हजार यांचे कोट्यावधी रुपये अडकले आहेत मागील पाच महिन्यापासून चेअरमन सुरेश कुटे हे सोशल माध्यमातून व्हिडिओ प्रसारित करत लवकरच ठेवी देण्यात येणार असल्याची बतावणी करत आहे. महाराष्ट्र निर्माण सेनेने या विरोधात उग्र आंदोलन करत सुरेश कुटे यांच्या निवासस्थानासमोर जागरण गोंधळ आंदोलन केले होते. यासह जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांना सुरेश कुटे व ज्ञानराधाचे प्रशासक मंडळ तसेच शाहीनाथ परभणे यांचेही पासपोर्ट जप्त करण्याची मागणी केली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी तत्काळ सुरेश कुटे व त्यांचे सहकारी कुलकर्णी यांचे पासपोर्ट जप्त करण्याचे आदेश दिले आहे. सामान्य ठेवीदार यांच्यासाठी महाराष्ट्र निर्माण सेना नेहमीच रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे. जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र निर्माण सेनेच्या मागणीची दखल घेत सुरेश कुटे यांचे पासपोर्ट जप्त केल्याने जिल्हा प्रशासनाचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी आभार मानले असून ठेवीदारांची पूर्ण रक्कम मिळेपर्यंत ज्ञानराधा व साईराम अर्बन विरोधात आंदोलन सुरूच राहणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.



## संपादकीय

### धूलिवंदनः होळीची रक्षा सर्वांगी फासा!

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. होळी सण वसंत ऋतूतील धान्य कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हा सण एक रात्र आणि एक दिवस चालतो, हिंदू कॅलेंडरप्रमाणे फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी सुरू होतो, जो ग्रेगेरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो.

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण भारतामध्ये, विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. होळी हा रंगाचा सण आहे. होळी या उत्सवाला होळी पौर्णिमा, होलिकोत्सव, होलिकादहन, अशी विविध नावे आहेत. होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. आता तर होळी खेळताना सेल्फी घेण्याचा आधुनिक पॅशन झाला आहे. पण हे धोकादायक ठरू शकते. या उत्सवाला होलिकादहन किंवा होळी, शिमगा, हुताशनी महोत्सव, फाग, फागुन दोलायात्रा, कामदहन अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत. कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या या लोकोत्सवाला फाल्गुनोत्सव आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त वसंतागमनोत्सव किंवा वसंतोत्सव असेही म्हणण्यात येते. देशी नाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच "शिमगा" असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते. होलिकादहन हे एका स्त्रिरुपाचे दहन करण्याची शिकवण देते, म्हणून जाणकारांनी या सणावर बहिष्कार घालण्याची मागणी रेटून धरल्याचे कळते. कारण एकीकडे स्त्रीला लक्ष्मी म्हणून पूजले जाते आणि येथे जाळले जाते. या दोन्ही कृतीत विसंगती आढळते.

महाराष्ट्रातील खेड्यांत होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात, पण हे योग्य नाही. त्याऐवजी काट्या, प्लास्टिक आणि अविघटनशील कचरा जाळावा. पेटलेल्या होळीभोवती बोंबा मारत लोक प्रदक्षिणा घालतात. त्यात अश्लील, अर्वाच्य शब्द उच्चारणे टाळले पाहिजे. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते.

भारतातील शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणि कृष्ण-बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. या दिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते, हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, ढुंढा, पुतना यासारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे

# आरोग्य व्यवस्थापन प्रणालीचे सुयश!

दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग- टीबी दिन साजरा करण्यात येतो. या निमित्ताने जागतिक आरोग्य संघटनेकडून आजच्या दिवशी जगभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं. त्या माध्यमातून या जीवघेण्या आजारापासून जगभरातल्या लोकांमध्ये जागरुकता निर्माण केली जाते. दि.२४ मार्च १८८२ साली जर्मन फिजिशियन आणि मायक्रोबायोलॉजिस्ट रॉबर्ट कोचने या जीवघेण्या आजाराच्या बॅक्टेरियाचा शोध लावला होता. त्यामुळे क्षयरोगाच्या निदानामध्ये आणि उपचारामध्ये मोठी मदत मिळाली आहे. आपण डॉक्टर म्हणून नव्हे तर एक सूज्ञ नागरिक या नात्याने सदर संकलित माहिती प्रस्तुत करत असल्याचे श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी म्हणतात... संपादक.

इ.स.१८८२ साली डॉ.रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञांच्या परिषदेत मांडला आणि त्याला दिनांक २४ मार्च रोजी मान्यता मिळाली. म्हणून दरवर्षी हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. क्षयरोगाला टीबी असंही म्हटलं जातं. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम तयार करण्यात येते. टीबी अथवा क्षयरोग एक संक्रमक आजार आहे. मायक्रो ट्युबरक्लुलोसिस बॅक्टेरियामुळे क्षयरोग होतो. या रोगाचा क्षयरोगग्रस्त रोग्याच्या खोकणे किंवा शिंकणे या माध्यमातून अन्य लोकांमध्ये प्रसार होतो. या रोगाबद्दल योग्य मार्गदर्शन आणि उपचार केल्यास त्याचे निदान होऊ शकते. जर या रोगामध्ये निष्काळजीपणा केला तर त्यामुळे मृत्यू ओढवू शकतो.

जागतिक आरोग्य संघटनेने २०३०पर्यंत या जीवघेण्या आजाराचे जगातून उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी लक्ष निर्धारण आणि नियोजन करण्यात आलं आहे. तर दुसरीकडे भारताने २०२५पर्यंत देशातून या रोगाचे उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार जगभरात दर दिवशी ४ हजार लोकांचा मृत्यू क्षयरोगाने होतो. भारतात क्षयरोगाच्या रुग्णांची संख्या मोठी असून आशियाई देशात भारताचा क्रमांक पहिला आहे. त्यामुळे भारत सरकारच्या वतीने जागतिक आरोग्य संघटनेने ठरवलेल्या लक्षाच्या आधीच देशातून क्षय़रोगाचे उच्चाटन करण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आला आहे. दरवर्षी क्षयरोग दिनाची थीम ठरवली जाते. त्यानुसार मागील वर्षीची थीम "येस! वी कॅन एण्ड टीबी." अशी होती. याचाच अर्थ हो, आपण टीबी संपवू शकतो, असा आहे.

२४ मार्च हा दिवस १८८२मध्ये साजरा केला गेला जेव्हा डॉ.रॉबर्ट कोच यांनी बर्लिनच्या इन्स्टिट्यूट ऑफ हायजीन विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या एका छोट्या गटाला क्षयरोगाचे कारण, टीबी बॅसिलस शोधून काढल्याची घोषणा करून वैज्ञानिक समुदायाला चकित केले. कोचचे सहकारी, पॉल एहरलिच यांच्या मते, "या संस्मरणीय सत्रात, कोच एका घोषणेसह लोकांसमोर हजर झाले ज्याने विषाणूजन्य मानवी संसर्गजन्य रोगाच्या कथेला एक टर्निंग पॉइंट म्हणून चिन्हांकित केले. स्पष्ट, सोप्या शब्दात कोचने एटिओलॉजीचे स्पष्टीकरण दिले. क्षयरोगाची खात्री पटवून देणारे, त्याच्या अनेक सूक्ष्मदर्शकांच्या स्लाइड्स आणि इतर पुरावे सादर करत आहेत." बर्लिनमध्ये कोचच्या घोषणेच्या वेळी क्षयरोग युरोप आणि अमेरिकेत पसरला होता, ज्यामुळे प्रत्येक सात लोकांपैकी एकाचा मृत्यू झाला होता. कोचच्या शोधामुळे क्षयरोगाचे निदान आणि उपचार करण्याचा मार्ग मोकळा झाला. सन १९८२मध्ये रॉबर्ट कोचच्या प्रेझेंटेशनच्या शंभरव्या वर्धापनदिनानिमित्त इंटरनॅशनल युनियन अगेन्स्ट ट्यूबरक्युलोसिस अँड लंग डिसीजने प्रस्तावित केले की २४ मार्च हा अधिकृत जागतिक क्षय दिवस म्हणून घोषित केला जावा. हा आईयूएटीएलडी आणि जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओ द्वारे "डेफीट टीबी: नाऊ एंड फॉरएव्हर" या थीम अंतर्गत वर्षभर चाललेल्या शताब्दीच्या प्रयत्नांचा एक भाग होता. जागतिक क्षयरोग दिनाला डब्ल्यूएचओच्या जागतिक आरोग्य असेंब्ली आणि युनायटेड नेशन्सने एक दशकानंतर अधिकृतपणे वार्षिक घटना म्हणून मान्यता दिली नाही.

सन १९९५च्या शरद ऋतूत, डब्ल्यूएचओ आणि रॉयल नेदरलँड्स ट्यूबरक्युलोसिस फाउंडेशन- केएनसीव्हीने हेग, नेदरलँड्स येथे पहिल्या जागतिक क्षय दिवस वकिली नियोजन बैठकीचे आयोजन केले होते; एक कार्यक्रम ते पुढील काही वर्षांत सह-प्रायोजक सुरू ठेवतील. सन १९९६मध्ये, डब्ल्यूएचओ, केएनसीव्ही, आईयूएटीएलडी आणि इतर संबंधित संस्था जागतिक क्षयरोग दिनाच्या विविध उपक्रमांसाठी सामील झाल्या होत्या. जागतिक क्षय दिन १९९७साठी डब्ल्यूएचओने बर्लिनमध्ये एक वार्ताहर परिषद घेतली ज्यादरम्यान डब्ल्यूएचओचे महासंचालक हिरोशी नाकाजिमा यांनी घोषित केले की "डॉट्स ही या दशकातील सर्वात मोठी आरोग्य प्रगती आहे, त्यानुसार आपण जीव वाचवू शकू." डब्ल्यूएचओचे ग्लोबल टीबी कार्यक्रम संचालक डॉ.अराता कोची यांनी वचन दिले की, "आज जागतिक क्षयरोगाच्या साथीची परिस्थिती बदलणार आहे, कारण आम्ही एक प्रगती केली आहे. हे आरोग्य व्यवस्थापन प्रणालीचे यश आहे ज्यामुळे ते शक्य होते. केवळ श्रीमंत देशांमध्येच नव्हे तर विकसनशील जगाच्या सर्व भागांमध्ये क्षयरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी, जिथे सर्व क्षयरोगाच्या ९५ टक्के रुग्ण सध्या अस्तित्वात आहेत." सन १९९८पर्यंत जवळपास २०० संस्थांनी जागतिक क्षयरोग दिनानिमित्त सार्वजनिक उपक्रम राबवले. जागतिक क्षयदिन १९९८च्या लंडनमधील वार्ताहर परिषदेत डब्ल्यूएचओने प्रथमच जगातील सर्वात जास्त क्षयरोगाचे ओझे असलेले बावीस देश ओळखले. पुढच्या वर्षी १९९९च्या जागतिक क्षय दिनाच्या तीन दिवसीय डब्ल्यूएचओ/ केएनसीव्ही नियोजन बैठकीत १८ देशांतील ६० पेक्षा जास्त प्रमुख टीबी वकिलांनी हजेरी लावली होती.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी सन २०००चा जागतिक क्षय दिन साजरा केला. क्लिंटन यांच्या म्हणण्यानुसार, "या मानवी शोकांतिका आहेत, आर्थिक संकटे आहेत आणि तुमच्यासाठी संकटांपेक्षा कितीतरी जास्त, ते जगासाठीचे संकट आहेत. रोगाचा प्रसार ही एक जागतिक समस्या आहे ज्यासाठी ... कोणतेही राष्ट्र रोगप्रतिकारक नाही." कॅनडामध्ये नॅशनल कोलॅबोरेटिंग सेंटर फॉर डिटरमिनंट्स ऑफ हेल्थने जागतिक क्षय दिन सन २०१४वर नोंदवले की राष्ट्रीय स्तरावर नोंदवलेले ६४ टक्के टीबी प्रकरणे परदेशी जन्मलेल्या व्यक्तींमध्ये आणि २३ टक्के आदिवासी लोकांमध्ये होती, क्षयरोग हे आरोग्याच्या समानतेच्या चिंतेचे प्रमुख क्षेत्र आहे. आज स्टॉप टीबी पार्टनरशिप, टीबीशी लढा देणाऱ्या संस्था आणि देशांचे नेटवर्क आईयूएटीएलडी एक सदस्य आहे आणि डब्ल्यूएचओचे जिनिव्हामध्ये स्टॉप टीबी पार्टनरशिप सचिवालय आहे, रोगाची व्याप्ती आणि ते कसे टाळावे आणि बरे कसे करावे यावर प्रकाश टाकण्यासाठी या दिवसाचे आयोजन केले जाते. !! जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने सर्वांना सावधगिरीबद्दल सदिच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप-**
9423714883.

# अभिनंदन बाबा: संभाजीराजे यांची भावनिक पोस्ट, वडिलांना मिळालेल्या उमेदवारीने संभाजीराजे भारावले

छत्रपती घराण्याचे कोल्हापूर गादीचे आणि राजर्षी शाहू महाराजांचे वंशज शाहू महाराज छत्रपती यांना काँग्रेस पक्षाकडून कोल्हापूरच्या जागेसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. शाहू महाराजांना महाविकास आघाडीकडून ही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे संभाजीराजे छत्रपती कोल्हापूरच्या जागेसाठी इच्छुक होते. पण आपल्या वडिलांनाच उमेदवारी मिळणार असल्याची माहिती समोर आल्यानंतर संभाजीराजे यांनी माघार घेतली होती. तसेच आपण आपल्या वडिलांना जिंकून आणण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करु, असं संभाजीराजे म्हणाले होते. त्यानंतर शाहू महाराजांना दोन दिवसांपूर्वी काँग्रेसकडून अधिकृतपणे उमेदवारी जाहीर झाली. यामुळे संभाजीराजे छत्रपती भारावले आहेत. त्यांनी ट्विटरवर (X) याबाबत पोस्ट करत आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली आहे. त्यांनी आपल्या वडिलांना उमेदवारी मिळाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. तसेच निवडणुकीत जिंकून येण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

"गेले तीन दिवस शाहू छत्रपती महाराजांच्या प्रचारार्थ मी राधानगरी तालुक्याच्या दौऱ्यावर



होतो. सह्याद्रीच्या डोंगररांगांनी वेढलेल्या आणि निबीड अरण्यात वसलेल्या "वाकीघोल" या अत्यंत दुर्गम भागात माझा दौरा होता. परवा रात्री मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर मोबाईलला थोडी रेंज आली आणि शाहू छत्रपती महाराजांना उमेदवारी जाहीर झाल्याची बातमी दिसली. मन आनंदून गेले. लागलीच कोल्हापूरला जाऊन महाराजांना भेटण्याची इच्छा झाली. पण लगेचच जबाबदारीचीही जाणीव झाली. हातातले काम... पुढे दिलेला शब्द.... आणि पुढचा नियोजित दौरा पूर्ण करूनच कोल्हापूरला निघायचे ठरवले. आज दौरा संपवून घरी आल्यानंतर लगेचच महाराजांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले",

# बदला घेण्यासाठी लढत असतील तरः, अमोल कोल्हे यांचा आढळराव पाटलांना सवाल

**दैनिक वादळ वार्ता**

शिरुर लोकसभा मतदारसंघात उमेदवारीवरुन महायुतीत रस्सीखेच सुरु आहे. शिरुरचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत आहेत. या जागेवर राष्ट्रवादीचा विद्यमान खासदार असल्याने महायुतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचा या मतदारसंघावर दावा आहे. तर दुसरीकडे शिवसेना नेते शिवाजी आढळराव पाटील हे लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. त्यांना आपण जिंकूनच येऊ अशी खात्री आहे. पण ही जागा महायुतीत राष्ट्रवादीसाठी सुटण्याची चिन्हं आहेत. त्यामुळे शिवाजी आढळराव पाटील हे लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची शक्यता आहे. आढळराव पाटील हे घड्याळ चिन्हावर निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे. त्यांच्या या निर्णयावर खासदार अमोल कोल्हे यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिलीय.



“2019 चा बदला घेण्यासाठी शिवाजी आढळराव पाटील निवडणूक लढणार असतील तर माझा प्रश्न आहे... एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलाने लोकसभेत जाऊच नये का? का फक्त परदेशात कंपन्या असणाऱ्या माणसाला लोकसभेत जाण्याचा अधिकार आहे? हा प्रश्न माझ्या मनात येतो”, असं म्हणत खासदार अमोल कोल्हे यांनी शिवाजी आढळराव पाटील यांना टोला लगावला.

‘मायबाप जनता सुज्ञ आहे’

“दुसरी गोष्ट म्हणजे निवडणुकीला सामोर जाण्याचा कोणाचा काय हेतू आहे, हेही स्पष्ट होतं. त्यांचं विधान पाहिलं तर त्यांना 2019 चा बदला घ्यायचा आहे. मला मात्र सर्वसामान्य शेतकऱ्यांचा, सर्वसामान्य नागरिकांचा, महाराष्ट्रातील जनतेचा, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा आवाज हा दिल्लीत घुमत राहावा यासाठी मायबाप जनतेकडे मी आशीर्वाद मागतोय. त्यासाठी मी या निवडणुकीत उभा आहे. त्यांना जर बदला वाटत असेल तर मायबाप जनता सुज्ञ आहे”, असं अमोल कोल्हे म्हणाले.

# कै.बाबुराव (आण्णा) मुंडे पाटील आणि कै. लक्ष्मीआक्का मुंडे यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन

## देवगांवचे बप्पा,नाना,बापू दरवर्षी करतात आई वडीलांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक वादळ वार्ता/केज**

तालुक्यातील देवगांव येथील माजी पोलीस पाटील कै.बाबुराव माधवराव मुंडे यांची २५ वी तर कै.लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे (पाटील) यांच्या ७ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम रविवार दि.२४ मार्च रोजी देवगांव येथे आयोजित केला असुन या कार्यक्रमाला देवगांव परिसरातील सर्वांनी उपस्थित राहण्याची विनंती विक्रमबप्पा मुंडे,शशिकांत मुंडे आणि रमाकांत (बापू) मुंडे यांनी केली आहे. केज तालुक्यातील देवगांव येथील पोलीस पाटील या पदावर अनेक वर्षे कामकाज करुन पंचक्रोशितील शेतकरी व गोरगरिब जनतेला न्याय



देणारे कै.बाबुराव माधवराव मुंडे यांची २५ वी तर कै.लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे (पाटील) यांच्या ७ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम रविवार दि.२४ मार्च रोजी सकाळी आकरा वाजता ह.भ.प.श्री. त्रिविक्रमानंद शास्त्री इंदुवासिनी (पिंपळनेरकर) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.यावेळी ह.भ.प.रतन महाराज सासुरेकर (संत एकनाथ महाराज संस्थान,सासुरा), ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर (साधु शिवरामपुरी मठ संस्थान विडा), ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर (साधु शिवरामपुरी मठ संस्थान, वरपगांव), ह.भ.प.ज्ञानोबा माऊली महाराज (विठ्ठल रुक्मीनी मठ संस्थान, बरड) ह.भ.प.नारायण महाराज (उत्रेश्वर पिंप्रीकर),ह.भ.प.केशव महाराज शास्त्री (टाकळीकर) यांच्यासह नातेवाईक पाहुणे मंडळीही उपस्थित राहणार आहेत.तरी या पुण्यतिथी कार्यक्रमाला देवगांव परिसरातील सर्वांनी उपस्थित राहण्याची विनंती विक्रमबप्पा मुंडे,शशिकांत मुंडे आणि रमाकांत (बापू) मुंडे यांनी केली आहे.

# निष्ठा वेशीला टांगून होत असलेल्या राजकारणाची आली किळस

## मतदार जागृती अभियान राबविणार-अँड. अजित देशमुख

वादळवार्ता/बीड

राजकारणाचा दर्जा दिवसेंदिवस ढासळत चालला आहे. आपापली सत्ता स्थानी कशी टिकवायची यावर सर्व पक्षातील घराणेशाहीचा जोर आहे. त्यामुळे बदलते राजकारण समाजासाठी घातक ठरत आहे. समाजाच्या कोणत्याही मुद्द्यावर चर्चा न करता घडत असलेल्या घटना आणि पक्ष बदल हे आता किळसवाणे ठरत आहे. कोणताच राजकारणी आपल्या पक्षावर प्रेम करत नाही. सगळी लबाडी आहे. त्यामुळे सामान्य जनतेने या उमेदवारांना हात दाखवणे गरजेचे असल्याचे मत जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

सर्व राजकारणी खराब आहेत, असेही नाही. काहींमुळे राजकारण टिकून आहे. मात्र रोज सकाळची वर्तमानपत्र वाचताना जिल्ह्यात, राज्यात सर्वत्र राजकारन्यांच्या कोलांट उड्या दिसत आहेत. काही लोक, काही लोकांना निवडून आणण्यासाठीचा प्रयत्न करत असल्याचे यातून स्पष्ट दिसत आहे. जनतेचे प्रश्न कधीही न मांडणाऱ्या लोकांना आता जनतेने ओळखले आहे. त्यामुळे अशा लोकांना पराभूत करणे आणि सामान्यांच्या प्रश्नाला मान देणाऱ्या उमेदवारांना निवडून देणे आवश्यक आहे.

पक्ष किती वेळा बदलावा. आपल्यातले अंतर्गत आणि पक्षांतर्गत वाद संपवून सत्ता असताना कशी आबाधीत ठेवायची, सत्ता कशी वाटून घ्यायची, याची अनेक उदाहरणं आता समोर येत आहेत. समाजकारण पाहण्यासाठी राजकारण करायला कोणी उरलं का ? हा प्रश्नही आता उपस्थित होत आहे.

वेगवेगळ्या समाजाची दुखणे राजकारण्यांनी ऐकून आणि पाहून घेणे आवश्यक असते. त्या दुखण्यावर मीठ चोळणे, हे उचित नसते. मात्र अनेकांना ही बाब समजत नाही. या लोकांनी आता मत मागायला गेल्यानंतर त्यांना याचे परिणाम भोगावे लागतील. मात्र राजकारणाची परिभाषा बदलत चालली असल्याने या लोकांना समाजाचे खरे प्रश्न समजणार कधी ? हा प्रश्नही निर्माण होत आहे.

आजची परिस्थिती पाहिली तर राजकारणात कोणी इमानदार आहे का ? हे सापडून देखील शोधणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे घराणेशाही, गुंडशाही, दडपशाही आणि भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसते. यावर प्रशासनाचा अजिबात अंकुश राहिलेला नाही. त्यामुळे देश रसातळाला नेण्यासाठी शासन आणि प्रशासन दोन्ही कारणीभूत ठरत आहेत. अर्थात शासन आणि प्रशासनात सर्वच लोक भ्रष्ट आहेत, अशातली गोष्ट नाही.

मतदानासाठी जास्तीत जास्त लोकांनी यावं. पारदर्शकतेने मत टाकावं. मतदारावर कुठलेही दडपण राहू नये. यासाठी प्रयत्न होणे गरजे आहे. समाजासमोर खरे मुद्दे येण्यासाठी आणि मतदार जागृत करण्यासाठी आपण मतदार जागृती अभियान राबवणार असल्याचे अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# रामानुजन गणित ऑलपियाड बक्षीस वितरण सोहळा थाटात संपन्न

**वादळवार्ता/बीड**

रामानुजन गणित ऑलपियाड बक्षीस वितरण सोहळा थाटात संपन्न झाला. बीड जिल्ह्यामध्ये श्री. विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, गुरुनानक प्राथमिक विद्यालय,बीड या शाळेने बाजी मारत त्यांची सर्वाधिक मेडल मिळवण्याची परंपरा कायम ठेवत या परीक्षेत सर्वाधिक मेडल मिळविण्याचा बहुमान प्राप्त केला. या अनुषंगाने गुरुनानक प्रा. वि.बीड येथे विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणाचा दिमाखदारकार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून मा. अविनाशजी वडने (तुरुंग अधिकारी,बीड), मा.शेख मुस्तफा (ए.पी. आय.,बीड) श्री धर्मराज आंधळे(शालेय समिती अध्यक्ष) मा. राजेशजी गदळे (सहशिक्षक तथा जिल्हा समन्वयक,बीड) तसेच मा.प्राचार्य श्री रामचंद्रजी हावळे (प्राचार्य,व्यंकटेश पब्लिक स्कूल,बीड) श्रीमती नागरगोजे मॅडम( मु.अ.व्यंकटेश पब्लिक स्कूल,बीड) हे उपस्थित होते. विद्येची आराध्य देवता माता सावित्रीबाई फुले आणि थोर भारतीय गणितज्ञ रामानुजन यांच्या प्रतिमांचे पूजन झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाळेतर्फे यथोचित सन्मान करण्यात आला,पुढे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तुरुंगाधिकारी श्री वडने सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की शाळेत आनंददयी,उत्साही वातावरणात मुले ज्ञान अर्जन करत असतात,आपले ध्येय साध्य करायचे असेल तर आपण मेहनत आणि कष्टाची तयारी ठेवली पाहिजे. तसेच कारागृह व शाळा



यातील स्वातंत्र याविषयी माहिती दिली. शाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांना, सुवर्ण, रजत आणि कांस्य पदकासोबत प्रमाणपत्र, धनादेश गुलाबपुषगुच्छ देऊन बक्षीस वितरित करण्यात आला. यामध्ये कु. सृष्टी धर्मराज आंधळे गोल्ड मेडल, चि.अथर्व महेश ठोकरे गोल्ड मेडल चि.आर्यन भगवान सपकाळ कु.अवंतीका श्रीकांत वनवे गोल्ड मेडल, सम्राट अनिल भालेराव गोल्ड मेडल , अदिती अशोक तांदळे गोल्ड मेडल , चि.विश्वास विकास जापडीया गोल्ड मेडल, कु.राजनंदिनी जयदेव दुबाले सिल्वर मेडल,चि.शेख अमान जब्बार ब्रॉन्झ मेडल, चि.अधिराज जितेंद्र ओव्हाळ ब्रॉन्झ मेडल, कु.अनुष्का अशोक गिऱ्हे ब्रॉन्झ मेडल, चि.शिवानंद राधाकिसन पवार ब्रॉन्झ मेडल, चि.श्रेयस हनुमंत डोईफोडे ब्रॉन्झ मेडल, चि.अनुष राजेश गदळे ब्रॉन्झ मेडल, चि.गणेश ज्ञानोबा सानप ब्रॉन्झ मेडल,आदित्य अशोक गिरे ब्रॉन्झ मेडल,शेख शहनवाज अलीहैदर ब्रॉन्झ मेडल या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तसेच व्यंकटेश पब्लिक स्कूल मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा देखील या प्रसंगी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री अशोकजी तांदळे यांनी केले तर प्रास्ताविक श्रीमती डोंगरे उज्वला यांनी करून उपस्थितांचे आभार श्रीमती मुंडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी श्रीमती पव्हणे मॅडम,श्री तेलप सर,श्री ठोकरे सर,श्रीमती कवडकर मिना यांनी परिश्रम घेतले.

# होळी व रंगोत्सवाचा आनंद साजरा करताना नागरिकांनी सावधगिरी बाळगावी

**दैनिक वादळ वार्ता पुणे/ पंकज भंडारी**

होळी व रंगोत्सवाचा आनंद साजरा करताना नागरिकांनी विद्युत यंत्रणेतील खांब, उपरी व भूमिगत वाहिन्या, रोहित्रे आदींपासून सुरक्षित



अंतर राखावे.संभाव्य जीवित वा वित्तहानी टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन महावितरण कंपनीने केले आहे. विद्युत यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखून होळी पेटवावी. शक्यतो मोकळ्या जागेचा वापर करावा. ट्रक किंवा इतर वाहनांतून होळी आणताना होळीचा स्पर्श रस्त्यालगतच्या वीजवाहिन्यांना होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. रंगोत्सव साजरा करताना पाण्याचे फवारे वीजवाहिन्यांपर्यंत उडणार नाहीत, याची काळजी घ्यावी. घरात होळी, रंग खेळताना वीजमीटर, वीज उपकरणे आदींचा पाण्यापासून बचाव करावा. ओल्या हाताने उपकरणे चालू वा बंद करणे टाळावे. आपत्कालिन स्थितीत महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही महावितरण कंपनीने कळवले आहे.

# कै.अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांना स्थैर्य मिळवून दिले-प्रा गणेश पोकळे

**दैनिक वादळ वार्ता**
**नेकनूर/ शेख शाकेर**

माथाडी कामगाराचे नेते मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष क्रांतीसुर्य कै.अण्णासाहेब पाटील यांना समाजातील तळागाळातील कामगारासाठी आणि समाजाच्या न्याय हक्कासाठी केलेले कार्य केले. त्यांनी कामगारांसाठी माथाडी ॲक्ट १९६९ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करून घेवून ख-या अर्थाने माथाडी कामगारांसाना स्थैर्य मिळवून दिले. असे प्रतिपादन संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे यांनी केले. येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल नेकनूर येथे कै. अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी कै. अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थाचे सचिव प्रा. गणेश पोकळे बोलत होते. या कार्यक्रमाला




शाळेच्या प्राचार्य सौ. स्वातीताई पोकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा.गणेश पोकळे म्हणाले की, केल्या ४० वर्षापासून मराठा समाज आपल्या विविध मागण्यांसाठी संघर्ष करत आहे. प्रामुख्याने कै. अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी लढा उभा केला. आपल्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी स्वतःचे बलिदान देखील दिले. आजही मराठा समाज आपल्या विविध मागण्यासाठी संघर्ष करत आहे. कै. अण्णासाहेब पाटील यांनी समाजासाठी आणि माथाडी कामगारांसाठी केलेले कार्य सदैव प्रेरणादायी आहे. असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य. सौ.स्वातीताई पोकळे मनाल्या की, कै. अण्णासाहेब पाटील यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन संस्थेचे अध्यक्ष रमेश भाऊ पोकळे यांनी १९८६ मध्ये कै. अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्था. नावाने संस्था स्थापन केली. आज या संस्थेच्या माध्यमातून गोर-गरीब कष्टकरी, कामगारांचे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. असेही त्या मनाल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत पटाईत यांनी केले. तर शेवटी आभार आयशा मिस यांनी मानल. या कार्यक्रमाला सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

## सोमवारी पुण्यातील मार्केट यार्ड राहणार बंद शेतमाल विक्रीस आणू नये शेतकऱ्यांसाठी महत्वाची माहिती

दैनिक वादळ वार्ता पुणे/पंकज भंडारी पुणेः धुलिवंदनानिमित्त मार्केट यार्ड येत्या सोमवारी (ता. २५) बंद ठेवण्यात येणार आहे. या दिवशी दरवर्षी कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मार्केट यार्डातील फळ, भाजीपाला, फुल, केळी आणि पान बाजार बंद असतो. त्यानुसार यंदाही हा बाजार बंद राहणार आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी याची दखल घ्यावी. शेतीमाल विक्रीस आणू नये, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर आणि सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी केले आहे.



# प्रकाश आंबेडकर यांची सर्वात मोठी घोषणा, कोल्हापुरात शाहू महाराजांना पूर्णपणे पाठिंबा

**दैनिक वादळ वार्ता मुंबई**

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी मोठी घोषणा केली. प्रकाश आंबेडकर यांचा महाविकास आघाडीसोबत एकत्र लढण्याचा निर्णय झालेला नाही. पण तरीसुद्धा त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मोठी घोषणा केली. काँग्रेसकडून कोल्हापूरच्या लोकसभा मतदारसंघाच्या जागेसाठी शाहू महाराज छत्रपती यांच्या नावाची घोषणा केली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी कोल्हापुरात शाहू महाराजांना पाठिंबा जाहीर केला आहे. “शाहू महाराजांची विचारसरणी आणि त्यांचं कुटुंब चळवळीच्या जवळचं कुटुंब असल्याचं आम्ही मानतो. तीनही ठिकाणी निर्णय घेण्यात आलाय की, पक्षाच्या वतीने त्यांना आमचा पाठिंबा आहे. त्यांना निवडून आणण्याच्या दृष्टीकोनातून जे प्रयत्न करावे लागतील ते सर्व प्रयत्न केले जातील. मागे जे घडलं होतं ते यावेळेस न घडू देणं याची दक्षता सुद्धा घेण्यात येईल. कोल्हापुरात शाहू शहाजी छत्रपती यांचं नाव काँग्रेसकडून जाहीर करण्यात आलं आहे. त्यांना वंचित बहुजन आघाडीचा पूर्ण पाठिंबा आहे”, अशी भूमिका प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केली. “महाविकास आघाडीचं विचारणार असाल तर तो तिढा तुम्ही त्यांनाच विचारा. कारण आम्हाला त्याबाबत माहिती नाही. दुसरं ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी नवा पक्षा रजिस्टर केलाय. त्यांनी एक लिस्ट आमच्याकडे सादर केलीय. तेव्हा त्यांना आम्ही सांगितलंय की, आमचंच घोंगड भिजत पडलेलं आहे. ते मिटल्याशिवाय आम्ही आपल्याशी बोलू शकत नाही. किंवा निर्णय घेऊ शकत नाही. आमच्यात दीड तास चर्चा झाली. ते कोणते मतदारसंघासाठी इच्छुक आहेत याची माहिती आम्ही घेतली. पुढे चर्चा सुरु राहणार आहे”, अशी प्रतिक्रिया प्रकाश आंबेडकर यांनी दिली.




‘महाविकास आघाडीचाच तिढा सुटलेला नाही’

“माझं म्हणणं असं आहे की, तुम्हाला आम्हाला सहकार्य केलं असतं तर कदाचित जे घोंगड भिजतयं ते भिजलं नसतं. तुम्ही सर्वांनी आम्हाला टारगेट केलं. म्हणून त्यांना त्यांचं कोंबडं झाकता आलं. त्यांचं कोंबडं आता बाग द्यायला लागलं आहे. 10 जागांवर शिवसेना आणि काँग्रेस यांचा दावा आहे. 5 जागांवर राष्ट्रवादी-शिवसेना आणि काँग्रेस असा वाद आहे. तुम्ही आम्हाला प्राधान्य दिलं असतं तिढा राहिला नसता. त्यांचंच भांडण मिटत नसेल तर आम्ही त्यामध्ये कुठे शिरायचं? त्यांच्यात आजही तिढा सुटला आहे, असं सांगण्यात आलेलं नाही”, असं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं.

आम्ही 26 तारखेपर्यंत थांबणार’“त्यांचाच तिढा सुटणार नसेल तर आम्ही येऊन उपयोग आहे. आम्ही आजच सकाळी सांगितलंय. आम्ही 26 तारखेपर्यंत थांबणार. त्यानंतर आम्ही आमची भूमिका मांडणार. आम्ही एक भूमिका मांडली आहे. काँग्रेस पक्ष ज्या सात जागा जिंकू शकतात, त्या जागा त्यांनी आम्हाला कळवाव्यात. आम्ही कुठे थांबलेलो नाहीत”, असं प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केलं.

## धक्कादायक, PF च्या पैशाच्या मोबदल्यात मॅनेजरची मुलीकडे सेक्सची मागणी, मुंबईतील घटना

**वादळवार्ता/वांद्रे** वांद्रे पूर्वेला राहणाऱ्या एका 23 वर्षीय महिलेने खासगी कंपनीच्या HR मॅनेजर विरोधात पोलीस तक्रार नोंदवली आहे. मृत वडिलांच्या प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे रिलीज करण्याच्या मोबदल्यात एचआर मॅनेजरने सेक्सची मागणी केली. माहिती-तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय दंड विधान संहितेच्या विविध कलमातंर्गत खेरवाडी पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा नोंदवला आहे. पण अजून आरोपीला अटक केलेली नाही.



तक्रारदार मुलगी घरकाम करते. ती आपला छोटा भाऊ आणि आजीसोबत राहते. तिच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला. वडिलांच 2015 साली निधन झालं. त्यावेळी ती 15 वर्षांची होती. वडिलांच्या कंपनीने त्यांचा PF कापला होता. वडिलांनी तिला नॉमिनी ठेवलं होतं. 18 वर्ष वयाची झाल्यानंतर तिला ती PF ची रक्कम मिळणार होती. पीएफवर क्लेम करण्यासाठी वेगवेगळे फॉर्म भरुन दिले. पण पीएफची रक्कम मिळाली नाही. चौकशी केल्यानंतर कंपनीच्या एचआर मॅनेजरकडे माझी फाईल असल्यास समजलं. मी एचआर मॅनेजरशी संपर्क साधल्यानंतर त्याने फंड रिलीज करण्याच्या बदल्यात शरीरसंबंधांची मागणी केली. त्यानंतर वांद्रे पूर्वला राहणाऱ्या या मुलीने खेरवाडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली. पोलीस या प्रकरणी चौकशी करत आहेत.

## शेतकरी कीर्तन महोत्सव नवी अध्यात्मिक चळवळ-ह.भ.प. राजाभाऊ महाराज चोपदार

**संताच्या केवळ आरत्या गावू नका-विचारांचे आचारण करा भारत महराज जाधव यांचे आवाहन**

संतांच्या नुसत्या आरत्या गावू नका तर त्यांचे विचार आचारणात आणा, असे आवाहन पंढरपूर येथील कैकाडी महाराज मठाचे मठाधिपती भारत महराज जाधव यांनी केले. महिलांना सध्या खूप पोथ्या वाचायला आवडतात, पण त्यांनी काल्पनिक पोथ्या वाचण्यापेक्षा सावित्रीबाई फुले, जिजामाता, अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र वाचावे, असे आवाहनही जाधव महाराज यांनी केले. शेतकरी कीर्तन महोत्सवामागील संकल्पना ह.भ.प शामसुंदर महराज सोन्नर यांनी प्रास्ताविकात मांडली. किसान सभेचे नेते ॲड. अजय बु-हांडे यांच्या संकल्पनेतून हा कीर्तन महोत्सव सुरू करण्यात आला असून यात शेतक-यांच्या सामाजिक, आर्थिक, अध्यात्मिक, शारीरिक आरोग्याची काळजी घेतली जाणार आहे, असेही शामसुंदर महाराज म्हणाले. यावेळी आनंद महाराज जोशी, राम गोसावी, शरद गलधर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**वादळवार्ता/परळी वैज्यनाथ**

शेतक-यांना केंद्र स्थानी ठेऊन आयोजिलेला कीर्तन महोत्सव ही नवी आध्यात्मिक चळवळ ठरेल. शेतक-यांच्या अध्यात्मिक उन्नतीबरोबर त्यांच्या मानसिक, शारीरिक आरोग्याची काळजी या कीर्तन महोत्सवातून घेतली जात आहे, हे एक क्रांतीकारी पाऊल आहे, असे प्रतिपादन ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मुख्य चोपदार राजाभाऊ यांनी केले. जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बीजोत्सवाच्या निमित्ताने धारुर तालुक्यातील कान्नापूर येथे दुस-या शेतकरी कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे. त्याच्या उद्घाटन प्रसंगी राजाभाऊ महाराज बोलत होते. पंढरपूर येथील कैकाडी महाराज




मठाचे मठाधिपती भारत महराज जाधव हेही यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना राजाभाऊ महाराज चोपदार पुढे म्हणाले की, शेतकरी आणि वारकरी एकच आहेत. दोघांनाही संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष सुसह्य व्हावा यासाठी हा कीर्तन महोत्सव आहे. सध्या वारकरी संप्रदायात वैचारिक भेसळ होत आहे. खरं तर वारकरी कोणत्याही एका जातीचा किंवा धर्माचा नाही. परंतू सध्या धार्मिक उन्माद निर्माण केला जात आहे. धर्मा धर्मात तेढ निर्माण केला जात आहे. अशा वेळी विवेकी वारक-यांनी अशा कोणाचाही द्वेष करू नये. आपला संघर्ष हा सत्य विरुध्द असत्य, निती विरुध्द अनिती असा असला पाहिजे, असे ते म्हणाले.

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस दला मार्फत उरण मध्ये रूट मार्च.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

आगामी लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील परिमंडळ २ अंतर्गत असलेल्या उरण तालुक्यात कायद्या व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच समाजकंटकावर, गुन्हेगारांवर वचक राहून निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पाडाव्यात याकरीता पोलीस दला मार्फत उरण शहरात तसेच उरण तालुक्यात विविध ठिकाणी रूट मार्च काढण्यात आला.



उरण पोलीस ठाणे हद्दीत एरिया डॉमिनेशन आणि रूट मार्च दिनांक २३/०३/२०२४ रोजी १०:३० वा ते ११:०४ वा. चे दरम्यान जासई पोलीस चौकी येथुन जासई गावा मधून दी.बा. पाटील मंगल कार्यालय पर्यंत, तसेच ११:४५ ते १२:३० वाजे दरम्यान उरण एसटी स्टँड चार फाटा येथुन उरण शहरातून राजपाल मार्गे उरण कोर्ट पर्यंत व १२:०५ ते १२:४० वा जे दरम्यान मोरा पोलीस ठाणे हद्दीतील हनुमान कोळीवाडा येथून बेलदार वाडा मार्गे हनुमान मंदिर मोरा जेटी पर्यंत आगामी लोकसभा निवडणूक २०२४ चे पुर्व तयारी चा भाग म्हणून एरिया फॅमिलीरिसिशन अँड एरिया डॉमिनेशनची मोहीम वरिष्ठांच्या आदेशानुसार राबवून सदर भागात रूट मार्च काढण्यात आला.

सदर रूट मार्चमध्ये उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम,पोनि (गुन्हे) सूर्यकांत कांबळे, ०८ एपीआय / पीएसआय , ३० पोलीस अंमलदार तसेच मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वपोनि सुनील शिंदे , ०१ एपीआय , ११ पोलीस अंमलदार यांच्यासह आरपीएफ चे ३ अधिकारी,३० अंमलदार असे शस्त्रे, लाठी, हेल्मेट व वाहनांसह सहभागी झाले होते.

# तर निवडणूक बॅलेट पेपरवर घेऊ, निवडणूक आयोगाची महत्त्वाची माहिती

**वादळवार्ता/मुंबई**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी आतापर्यंत राज्यातील कोणत्या मतदारसंघात किती उमेदवारांनी अर्ज भरला आहे, निवडणूक आयोगाची तयारी कशी सुरु आहे, तसेच आचारसंहिता भंग करणाऱ्यांवर कशी कारवाई केली जात आहे? याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी एस. चोक्कलिंगम यांना मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाविषयी प्रश्न विचारण्यात आला. मनोज जरांगे यांच्या समर्थक आंदोलकांकडून मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन प्रत्येक मतदारसंघात शेकडो जणांकडून उमेदवारी अर्ज भरणार असल्याचा दावा केला जातोय. असं झाल्यास निवडणूक आयोगावर ताण पडू शकतो का? असा प्रश्न मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली.

“कुठल्याही परिस्थितीत आम्ही इलेक्शनचं काम पूर्ण करु. EVM ची कपॅसिटी 300 उमेदवारांची आहे. 300च्या वर जर उमेदवार गेले तर बॅलेट पेपरवर निवडणुका घेणार”, अशी भूमिका मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी मांडली. “पहिल्या टप्प्यात 19 एप्रिलला निवडणुका पार पडणार आहे. यासाठी 20 मार्चला अर्ज घेण्यास सुरुवात झालीय. तर अर्ज



मागे घेण्याची तारीख 30 मार्च आहे. आतापर्यंत रामटेक – 1 , भंडारा-गोंदिया 2, गडचिरोली-चिमूर – 2, चंद्रपूर – 0 इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. वर्किंग डेस कमी आहेत, त्यामुळे ते बघून अर्ज करावे. 17 मार्च ते 22 मार्च या एका आठवड्यात 1 लाख 84 हजार नवीन मतदारांची नोंदणी झालीय. आणखी मुदत बाकी आहे. लवकरात लवकर नवीन मतदारांनी नोंदणी करा”, असं आवाहन त्यांनी केलं.आतापर्यंत किती जणांवर कारवाई?“आतापर्यंत 308 बिना परवान्याच्या शस्त्रास्त्रे जप्त केले आहेत. राज्यात 77 हजार 148 परवाने दिले गेले आहेत. त्यातील 45 हजार 755 शस्त्रास्त्रे ताब्यात घेण्यात आलीय. 13 हजार इसमांवर कारवाई करण्यात आलीय. मतदानाच्या दिवशी पेड हॉलिडे द्यावी. मतदानाच्या दिवशी dry day जाहीर झालाय. 85 वर्षांवरील नागरिकांना गृह मतदानाची सुविधा असेल”, अशी माहिती एस. चोक्कलिंगम यांनी दिली.कारवाईतून किती पैसे जप्त?

“आचारसंहिता सुरु झाल्यापासून आतापर्यंच कोट्यवधी रुपये विविध कारवाईतून जप्त करण्यात आले आहेत. यामध्ये मुंबई उपनगरातून सर्वात जास्त कॅश जप्त करण्यात आली आहे. मुंबई उपनगरातून तब्बल 3 कोटी 60 लाख रुपये रोकड जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. जिल्हा स्तरावर कारवाई सुरू आहे. आम्ही भारतीय निवडणूक आयोगापर्यंत तक्रारी पोहोचवतोय. 98 हजार अंतर्गत पोलीस स्टेशन आहेत”, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )